**-: प्रेस नोट :-**

**गु.प्र.शा, गु.अ.वि. कक्ष -८, मुंबई** **दिनांक :- १५/१२/२०२१**

**मुंबई शहरामध्ये मोटार सायकल चोरी करणाऱ्या दोन सराईत गुन्हेगारांना जेरबंद करून चार मोटर सायकलीसह चार गुन्हे उघडकीस आणण्यास गुन्हे प्रकटीकरण शाखा, कक्ष-८,अंधेरी, मुंबई यांना मोठे यश..**

**---ooo---**

| | |
|---|---|
| **कक्ष** | गुन्हे प्रकटीकरण शाखा, कक्ष-८, अंधेरी, मुंबई |
| **पोलीस ठाणे** | वाकोला पोलीस ठाणे, मुंबई |
| **गु.र.क्र.व कलम** | गुरक्र. ९९७/२०२१ कलम ३७९ भादवि |
| **गुन्हा दाखल दिनांक** | दिनांक ११/१२/२०२१ रोजी १४.४७ वा. |
| **गुन्हा घडला दिनांक व वेळ** | दिनांक ०६/१२/२०२१ रोजी १८.३० वा ते ०७/१२/२०२१ रोजी १०. ०० वा. |
| **घटनास्थळ** | एसआरएल डायग्नोस्टीक सेंटर समोरील रस्ता, ८/६३, आंनद आगर, सर्विस रोड, सांताक्रुझ पुर्व मुंबई |
| **हस्तगत मालमत्ता** | १) होंडा ॲक्टीव्हा मोटार सायकल क्र. एमएच-४७-एए-५३७३ (खरा नंबर:- एमएच-४८-एझेड-५२५६)<br>२) होंडा ॲक्टीव्हा मोटार सायकल क्र.एमएच-४७-व्ही-३१०९<br>३) होंडा ॲक्टीव्हा मोटार सायकल क्र. एमएच-०२-एफसी-५११५<br>४) यामाहा R15 मोटार सायकल क्र. एमएच-०२-ईटी-८८४१<br>एकुण किंमत रूपये २,७०,०००/- |
| **आरोपीची संख्या** | ०२ |

मोटार सायकल चोरीचे गुन्हे उघडकीस आणण्याचे हेतुने मा.वरिष्ठांच्या आदेशान्वये गुन्हे शाखा, कक्ष ८, अंधेरी,मुंबईच्या पथकाकडुन नोंद मोटार वाहन चोरीच्या गुन्हयाच्या अनुषंगाने तपास चालु करण्यात आला होता. दि.१४/१२/२०२१ रोजी मोटार सायकल चोरीतील आरोपी हे मोटार सायकलसह नालासोपारा परिसरात येणार असल्याबाबत खबऱ्या मार्फतीने **पोलीस नाईक क्र ०१७९३ /आनंद तावडे** यांना गोपनीय माहिती प्राप्त झाली होती.

प्राप्त माहितीच्या अनुषंगाने मा. वरिष्ठांच्या परवानगीने गुन्हे प्रकटीकरण शाखा, कक्ष-८ चे सपोनि लक्ष्मीकांत शेलकर व पथकाने नालासोपारा पुर्व परिसरात सापळा लावुन दोन इसमांना ताब्यात घेवुन त्यांच्याकडे कौशल्यपुर्ण चौकशी केली असता त्यांनी वाकोला पोलीस ठाणे हददीतुन तीन होंडा ॲक्टीव्हा, एक यामाहा R15 अश्या एकुण चार मोटार सायकल चोरी केल्याची कबुली दिली. त्या अनुषंगाने सदरच्या चार मोटार सायकल धानीव स्मशानभुमी, नालासोपारा पुर्व जि. पालघर परिसरातुन जप्त करण्यात आल्या.खालील नमुद इसम व जप्त मोटार सायकल पुढील कारवाईकरीता वाकोला पोलीस ठाण्याचे ताब्यात देण्यात आले.

**अटक इसमाची माहिती :-**

१)नवरंग अरूण पंडित, वय १९ वर्षे,
२)विवेक राजेद्रं गुप्ता, वय १९ वर्षे

**जप्त करण्यात आलेल्या मोटार सायकल व उघडकीस आणलेले गुन्हे**

१) वाकोला पोलीस ठाणे गुरक्रं.९३९/२१ कलम ३७९ भादवि
होंडा ॲक्टीव्हा मोटार सायकल क्र. एमएच-४७-एए-५३७३ (खरा नंबर:- एमएच-४८-एझेड-५२५६)
२) वाकोला पोलीस ठाणे गुरक्रं.९८३/२१ कलम ३७९ भादवि
होंडा ॲक्टीव्हा मोटार सायकल क्र.एमएच-४७-व्ही-३१०९
३) वाकोला पोलीस ठाणे गुरक्र.९९७/२१ कलम ३७९ भादवि
होंडा ॲक्टीव्हा मोटार सायकल क्र. एमएच-०२-एफसी-५११५

४) वाकोला पोलीस ठाणे गुरक्र १००९/२१ कलम ३७९ भादवि
यामाहा R15 मोटार सायकल क्र. एमएच-०२-ईटी-८८४१
एकुण किंमत रुपये २,७०,०००/-

सदरची यशस्वी कामगिरी मा. पोलीस सह आयुक्त (गुन्हे), मुंबई श्री.मिलींद भारांबे, मा.अपर पोलीस आयुक्त (गुन्हे), श्री एस.वीरेश प्रभु, मा. पोलीस उप आयुक्त,(प्रकटीकरण-१) श्री. निलोत्पल, सहा.पोलीस आयुक्त डी,(पश्चिम) श्री. नितीन अलकनुरे यांच्या मार्गदर्शनाखाली प्रभारी पोलीस निरीक्षक मधुकर सानप, पोनि दिपक सावंत, सपोनि लक्ष्मीकांत शेलकर,पोलीस अंमलदार आनंद तावडे, विश्वास सावंत, सचिन रहेरे, किरण चुडनाईक, विश्वास भगत, प्रकाश मळेकर, सुवर्णा भिताडे यांनी पार पाडली.

***D-1/94/2021***